# ५. कौटुंबिक संसाधने


५.१ अर्थ आणि व्याख्या

५.२ संसाधनांचे वर्गीकरण

५.३ संसाधानांची वैशिष्ट्ये

५.४ कौटुंबिक संसाधनांवर परिणाम करणारे घटक


**चर्चा करू या :**

१. संसाधने म्हणजे काय?

वैयक्तिक व कुटुंबाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी व ध्येय साध्य करण्यासाठी विविध भौतिक व अभौतिक बाबींची आवश्यकता असते. अशा मूर्त व अमूर्त गोष्टींना संसाधने असे म्हणतात. कुटुंबास उपलब्ध असलेली संसाधने गृहव्यवस्थापनचा पाया आहे.

प्रत्येक व्यक्ती आणि कुटुंबाजवळ विविध संसाधने असतात. जसे – पैसा, वेळ, ऊर्जा, कौशल्य, योग्यता, ज्ञान, बुद्धी, अभिवृत्ती/दृष्टिकोन इत्यादी. या व्यतिरिक्त काही सामुदायिक संसाधने पोलिस, अग्निशामक दल, विद्युत सेवा व पाणीपुरवठा सेवा, बगिचे, रस्ते, ग्रंथालये, शैक्षणिक संस्था व दवाखाने इत्यादींचा व्यक्ती किंवा कुटुंब आपल्या गरजा व ध्येय पूर्ण करण्यासाठी उपयोग करतात.

या संसाधनांची काही सामान्य वैशिष्ट्ये आहेत. संसाधने उपयोग, मर्यादित आणि एकमेकांशी संबंधित असतात, म्हणूनच त्यांच्या विचारपूर्वक उपयोगाकरिता सर्व संसाधनांना व्यवस्थापन प्रक्रिया लागू करणे गरजेचे असते. सर्व संसाधनांना आपल्या जीवनात महत्त्वाचे स्थान आहे.

## ५.१ अर्थ आणि व्याख्या :

प्रत्येक कुटुंबास काही विशिष्ट गरजा व ध्येय पूर्ण करायची असतात. या कौटुंबिक ध्येयांची पूर्तता संसाधनांच्या उपलब्धतेवर अवलंबून असते. संसाधन म्हणजे असे साधन किंवा साहित्य, की ज्याच्या उपयोगाने आपण कार्य करू शकतो किंवा ध्येय साध्य करू शकतो. आपल्या गरजा पूर्ण करणारे भौतिक व मानवीय गुणधर्म म्हणजेच संसाधने. संसाधनांची व्याख्या खालीलप्रमाणे करता येते.

**रॅन्डम हाऊस शब्दकोशानुसार 'रक्षित करण्यात आलेल्या पुरवठ्याच्या, आधाराच्या व मदतीच्या स्रोतास संसाधन असे म्हणतात.'** (Reseources means a source of supply support or aid especially one held in reserve.)

**मॅलॅक डेकान यांच्या मते 'वेगवेगळ्या मागण्यांच्या पूर्ततेकरिता आवश्यक ती सुप्तशक्ती असणारे महत्त्वपूर्ण घटक म्हणजे संसाधने.'** (Reseources are means which are available and recognized for their potential in meeting demands.")

प्रत्येक व्यक्तीजवळ उपयोगाकरिता विविध संसाधने असतात. कुटुंबाजवळ असलेल्या संसाधनांना कौटुंबिक संसाधने असे म्हणतात. वैयक्तिक व कौटुंबिक ध्येय साध्य करण्याकरिता अशा संसाधनांची जाणीव करून देणे आणि त्याची योग्य वाटणी किंवा विभागणी करणे गरजेचे असते प्रत्येक व्यक्तिपरत्वे आणि कुटुंबानुरूप संसाधनांचे उपलब्ध प्रमाण भिन्न असते. परिणामकारक व्यवस्थापनाकरिता संसाधनांचा पूर्ण प्रमाणात उपयोग करणे आवश्यक असते.

## ५.२ संसाधनांचे वर्गीकरण :

कुटुंबासाठी उपलब्ध संसाधने वेगवेगळ्या प्रकारे वर्गीकृत केल्या जाऊ शकतात. संसाधनांच्या स्रोताच्या आधारे संसाधनांचे खालील दोन प्रकारात वर्गीकरण करतात.

**संसाधनांचे वर्गीकरण**

**मानवीय संसाधने**
- वेळ
- ऊर्जा/शक्ती
- रुची/आवड
- कुशलता/कौशल्य
- ज्ञान
- योग्यता
- प्रवृत्ती

**अमानवीय संसाधने**
- पैसा
- भौतिक संसाधने
- मालमत्ता
- सामुदायिक सुविधा

**जरा डोके चालवा.**

खालील दिलेल्या संसासधनांना मानवीय आणि अमानवीय संसाधने म्हणून ओळखा व लिहा.

| | | | |
|---|---|---|---|
| वेतन, निवृत्ती वेतन, नफा इत्यादी. | | विविध उपकरणांविषयीचे ज्ञान | |
| शारीरिक व मानसिक कामाकरिता उपयोगी | | घर, गुंतवणूक, दागदागिने इत्यादी | |
| दवाखाने, शाळा, महाविद्यालये, वाहतुकीची साधने, बगिचे, उद्याने, ग्रंथालये | | पेंटींग, पाककला, भरतकाम, खेळ इत्यादी उपयुक्त. | कौशल्य |
| शारीरिक व मानसिक योग्यता म्हणून वर्गीकरण करता येऊ शकते. | | काम करण्याची प्रवृत्ती | |
| संगीत, सजावट, वाचन, लेखन इत्यादी | आवड/रुची | | |
| दिवसाचे चोवीस तास | | | |

**मानवीय संसाधने :**

व्यक्तिगत वैशिष्ट्ये व गुणविशेषांचा समावेश असलेल्या आणि मानवामध्ये आंतरिकरित्या निर्माण झालेल्या संसाधनांना मानवी संसाधने असे म्हणतात. अशी संसाधने नेहमी मानवी गुण व व्यक्तिगत स्वभाव-वैशिष्ट्ये किंवा विशेष गुणांशी संबंधित असतात. मानवीय संसासधने काही प्रमाणात मूर्त किंवा अमूर्त स्वरूपाची असतात. व्यक्तीला ती अनुभवता येतात पण प्रत्यक्ष पाहता किंवा मोजता येऊ शकत नाहीत. त्यांच्या अमूर्त स्वरूपामुळे त्यांचे महत्त्व सहज लक्षात येत नाही. अशी संसाधने अनेकदा दुर्लक्षित असतात किंवा त्यांचा उपयोग पूर्ण प्रमाणात केला जात नाही. वेळ, ऊर्जा/शक्ती, कौशल्य, योग्यता, ज्ञान, प्रवृत्ती, रुची किंवा आवड इत्यादी मानवी संसाधने आहेत. या संसाधनांचा उत्पादनक्षम हेतूने उपयोग करतात.

१) **वेळ :** सतत घडणाऱ्या घटनांचा क्रम म्हणजे वेळ. वेळ हे महत्त्वाचे मानवी संसाधन आहे. एकदा वाया गेलेला वेळ परत मिळविता येत नाही. प्रत्येक व्यक्तीला वेळ सारख्याच प्रमाणात व मर्यादित स्वरूपात उपलब्ध असतो. मिनिट, तास, दिवस, आठवडे, महिने यासारखी परिमाणे वापरून वेळ सहज मोजता येतो. सर्वांना ध्येय साध्य करण्यासाठी व इतर भौतिक संसाधनांच्या निर्मितीसाठी वेळेचा उपयोग होतो. वेळेची जाणीव व वेळेचे महत्त्व व्यक्तीपरत्वे बदलते. ठरविलेले काम जलदगतीने व सहज होण्यासाठी आणि ताण-तणाव कमी करण्याकरिता वेळेचे व्यवस्थापन व्यक्तीला सक्षम करते.

२) **ऊर्जा किंवा शक्ती :** काम करण्याची क्षमता म्हणजे ऊर्जा किंवा शक्ती अशी ऊर्जा किंवा शक्तीची व्याख्या करतात. सक्रिय शारीरिक आणि मानसिक कार्य करण्याची ताकद म्हणजे ऊर्जा/शक्ती आहे. विविध कार्य करण्याकरिता प्रत्येकालाच ऊर्जा किंवा शक्तीची आवश्यकता असते. ऊर्जा सहज मोजणे कठीण आहे. एखादे काम केल्यानंतर जाणवणारा थकवा किंवा कंटाळा हे काम करताना वापरलेल्या ऊर्जेची किंवा शक्तीची व्यक्तीला जाणीव करून देऊ शकतो. व्यक्तीला उपलब्ध असलेली ऊर्जा किंवा शक्ती व्यक्तीपरत्वे आणि कालपरत्वे भिन्न असते. व्यक्तिगत आरोग्य, कामातील आवड, काम करण्याची परिस्थिती आणि काम पूर्ण करण्यासाठी लागणारे प्रयास इत्यादींचा ऊर्जेच्या किंवा शक्तीच्या वापरावर परिणम होतो. कार्याचा योग्य क्रम, योग्य पद्धती ठेवल्यास आणि अनावश्यक हालचाली टाळल्यास ऊर्जेचे व्यवस्थापन करता येते.

कोणतेही ध्येय पूर्ण करण्यासाठी आणि काम करण्यासाठी लागणाऱ्या ऊर्जेचे दोन प्रकारात वर्गीकरण करता येते. :

(अ) शारीरिक ऊर्जा किंवा शक्ती

(ब) मानसिक ऊर्जा किंवा शक्ती

**शारीरिक शक्ती किंवा ऊर्जा म्हणजे शारीरिक कार्य करण्याची क्षमता आणि सुप्त ताकद होय.** वाचणे, चालणे, चढणे, धावणे, वस्तू उचलणे यांसारख्या विविध क्रिया करण्याकरिता विविध प्रयास, जसे – दृष्य प्रयास, मानसिक प्रयास, विशेषांग प्रयास, पादप्रयास, हस्तप्रयास इत्यादींची गरज असते. दृष्य प्रयास व मानसिक प्रयासांकरिता कमी ऊर्जा लागते तर विशेषांग प्रयासास जास्त ऊर्जा वापरली जाते.

**मानसिक ऊर्जा किंवा शक्ती म्हणजे मानसिक काम करण्यासाठीची ताकद किंवा सामर्थ्य होय.** निर्णय प्रकियेत विचार करताना कारणमीमांसा, पाठ करणे आणि आठवणे यांसारख्या क्रियांसाठी मानसिक ऊर्जा किंवा शक्तीची आवश्यकता असते.

**विचार करा :**
शारीरिक आणि मानसिक ऊर्जा/शक्ती यांमधील फरक.

**३) आवड किंवा रुची :** ऑक्सफोर्ड डिक्शनरीनुसार रुची किंवा आवड म्हणजे काहीतरी किंवा कोणाबद्दल जाणून घेण्याची किंवा शिकण्याची इच्छा असणे. सोपविलेल्या कामात आवड असणे अतिशय महत्त्वाचे असते. जर एखाद्या कामात आवड असेल, तर ते काम जलद व उत्तम गुणवत्ता दर्जासह कार्यक्षमतने पूर्ण होते. कुटुंबातील विविध सदस्यांना वेगवेगळ्या कामात आवड असल्याचे निदर्शनास येते. यामुळे आवडीप्रमाणे कामाची विभागणी केल्यास थकवा न येता कामात आनंद वाटतो आणि विशिष्ट कामात यश मिळण्यास मदत होते. कौटुंबिक सदस्यांच्या विविध रुची किंवा आवड, काही संसाधनांची बचत करण्यास किंवा काही संसाधने निर्माण करण्यास मदत करतात. उदाहरणार्थ : गार्डनिंगमध्ये आवड असलेले कौटुंबिक सदस्य घरी गार्डन करून भाज्या पिकवून पैशाची बचत करू शकतात.

**४) योग्यता : दिलेले काम करण्याची व्यक्तीची शारीरिक आणि मानसिक क्षमता म्हणजे योग्यता.** काही व्यक्तींजवळ काम करण्याची शारीरिक क्षमता किंवा ताकद असते, तर काहींजवळ बौद्धिक क्षमता असते. योग्यता सामान्यपणे जन्मजात असतात आणि प्रशिक्षण व सरावाने म्हणजेच वारंवार केल्याने ती वाढू शकते. रुचीमुळे योग्यता वाढते. एखाद्या व्यक्तीला एखाद्या कामात रुची असल्यास ती किंवा तो ते काम वारंवार करते, ज्यामुळे योग्यता वृद्धिंगत होण्यास मदत होते.

**५) कौशल्य किंवा कुशलता :** कार्यक्षमतेने आणि दर्जात्मक काम करण्याची योग्यता म्हणजे कौशल्य किंवा कुशलता. कुटुंबातील सदस्यांजवळ पाककला, शिवण काम यांसारख्या नावीन्यपूर्ण कलेतील कौशल्ये अशी विविध क्षेत्रातील कौशल्ये असतात. यातील काही कौशल्ये जन्मजात असतात, तर काही सरावाने व प्रशिक्षणाने संपादित करता येतात. जर व्यक्तीला त्यात आवड असेल, करण्याची योग्यता असेल आणि शिकण्याची व सरावाची इच्छा असेल, तर कोणतेही कौशल्य मिळवता किंवा प्राप्त करता येऊ शकते. उदाहरणार्थ : गृहिणी मायक्रोवेव्ह ओव्हन, फूड प्रोसेसर यांसारखी उपकरणे हाताळण्याचे तंत्र शिकून स्वयंपाकातील कौशल्य वाढवू शकते.

**६) ज्ञान :** योग्य पर्यायाची निवड करण्यासाठी आणि संसाधनांचा अपव्यय टाळण्यासाठी ज्ञान हे मानवीय संसाधन अतिशय महत्त्वाचे आहे. शिक्षण किंवा अभ्यासाने आणि अनुभवाने ज्ञान मिळविता येते आणि मिळवलेले ज्ञान सतत वाढविताही येते. पोशाख निर्मिती, पोषणशास्त्र व श्रमबचतीच्या साधनांचे गृहिणीला असलेले ज्ञान जीवनाची गुणवत्ता वाढविण्यास निश्चितच सहाय्यक ठरू शकते.

**७) प्रवृत्ती :** एखाद्याबद्दल किंवा एखाद्या गोष्टीबद्दल विचार करण्याची पद्धत किंवा भावना म्हणजे प्रवृत्ती, जे एखादी क्रिया करण्यास प्रेरणा देते किंवा कामाची प्रगती थांबवते. काही व्यक्ती आपल्या ध्येयासाठी आशावादी प्रवृत्तीच्या असतात, म्हणूनच त्या स्वयंप्रेरणेने च उत्साहाने योग्य दिशेने कार्य करतात. निराशावादी प्रवृत्तीच्या व्यक्ती मंद गतीने काम करतात किंवा काम थांबवतात. निराशावादी प्रवृत्तीच्या लोकांना काम करण्यासाठी दुसऱ्यांकडून प्रेरणेची आणि समुपदेशनाची आवश्यकता असते. ठरविलेली ध्येय यशस्वीरित्या साध्य करण्यासाठी व्यक्तीने परिस्थितीनुरूप आणि बदलांनुसार आपल्या प्रवृत्तीचे स्वरूप बदलावे.

**थोडे आठवा :**

१. तुम्ही वरीलप्रमाणे शिकलेल्या संसाधनांपैकी विविध मानवीय संसाधने कोणती ?

२. तुमच्या दैनंदिन जीवनात मानवी संसाधनांचा उपयोग काय ?

**अमानवीय संसाधने :**

अमानवीय संसाधने मूर्त स्वरूपाची असतात. ही संसाधने सहज ओळखता येतात. पैसा, भौतिक वस्तू, नाशवंत आणि अनाशवंत अन्नपदार्थ, उपकरणे, फर्निचर, दागदागिने, मालमत्ता तसेच दवाखाने, बगिचे, ग्रंथालये, पोलिस दल, अग्निशामक सेवा, बाजार, वाहतुकीच्या सुविधा, पाणीपुरवठा, वीजपुरवठा इत्यादी सामुदायिक सेवा-सुविधांचा यात समावेश होतो. अमानवीय संसाधने एका व्यक्तीकडून दुसऱ्याला सहज हस्तांतरित करता येतात. अशा सर्व संसाधनांना स्वत:ची मर्यादा व वैशिष्ट्ये असतात. मानवीय संसाधनांच्या उपयोगाने ही संसाधने निर्माण होतात. जास्तीत जास्त ध्येय साध्य करण्यासाठी या संसाधनांचे योग्य व्यवस्थापन करणे आवश्यक असते.

१) **पैसा :** अमानवीय संसाधनांपैकी पैसा हे महत्त्वाचे संसाधन आहे. पैसा सहज मोजता येतो व हस्तांतरित करता येतो. वस्तू किंवा सेवा मिळविण्याचे पैसा हे सर्वमान्य माध्यम आहे. वेतन, मानधन, व्याज, भाडे, नफा इत्यादी पैसा मिळविण्याचे मार्ग आहेत. पैसा सर्वांना सारख्या प्रमाणात उपलब्ध नसतो, परंतु इतर संसाधनांच्या वापराने जास्तीचे काम करून वाढविता येऊ शकतो. भविष्यात आयुष्य सहज व सुखकर होण्याकरिता पैसा बचत करून साठवून ठेवता येऊ शकतो. परिस्थितीनुरूप पैशाची उपलब्धता बदलत असल्यामुळे पैशाचे योग्य व्यवस्थापन करणे महत्त्वाचे असते. पैशाच्या काळजीपूर्वक उपयोगाकरिता अंदाजपत्रक तयार करणे ही सामान्य पद्धत आहे.

२) **भौतिक वस्तू :** दैनंदिन उपयोगातील वापरून संपणाऱ्या गोष्टी जसे - अन्नधान्य, कपडे इत्यादी तसेच दीर्घकाळ टिकणाऱ्या वस्तू जसे - विविध उपकरणे, फर्निचार, सजावटी वस्तू, वाहने इत्यादींचा भौतिक वस्तूंमध्ये समावेश होतो. अशा संसाधनांची संख्यात्मक व गुणात्मक मोजमाप सहज करता येते, यामुळेच प्रत्येक कुटुंबाला आपल्याजवळ असलेल्या अशा संसाधनांच्या उपलब्धतेची व त्यांच्या उपयोगाची स्पष्ट कल्पना असते. ही संसाधने सामान्यपणे विकत घेतात किंवा कुटुंबाने तयार केलेली असतात. अशा संसाधनांचा दर्जा व उपलब्धता पैशाच्या उपलब्धतेवर अवलंबून असतो. घरी तयार केलेल्या भौतिक वस्तूंच्या मर्यादा व दर्जा, मानवीय संसाधने जसे - योग्यता, कौशल्य, आवड, प्रवृत्ती, वेळ आणि ऊर्जा इत्यादींवर अवलंबून असतो.

३) **मालमत्ता :** कुटुंबाजवळ उपलब्ध असलेल्या मौल्यवान वस्तू व बाबी म्हणजे मालमत्ता होय. मालमत्तेत बचत व गुंतवणुकीचा समावेश होतो. पैसा भविष्यात उपयोगी पडावा म्हणून बँक, पोस्ट ऑफिस इत्यादीमध्ये बचत करून ठेवतात. तसेच शेअर्स, बॉन्ड्स, घर, जमीन व दागदागिन्यांमध्येही पैशाची गुंतवणूक करून ठेवू शकतात. अडचणीच्या वेळी अशा संसाधनांचे पैशात रूपांतर करता येऊ शकते. भविष्यात अडचणींवर मात करण्यासाठी प्रत्येकाजवळ काही मालमत्ता असणे आवश्यक आहे.

४) **सामुदायिक सुविधा :** मनुष्य हा कुटुंब आणि समाजाचा घटक आहे; म्हणूनच प्रत्येक व्यक्ती सामुदायिक सुविधांचा फायदा घेऊ शकतो. सामुदायिक सुविधा किंवा सेवांचे तीन गटात वर्गीकरण केले जाते.

अ) आरोग्य आणि सुरक्षा सेवा

ब) आत्मसंवर्धन किंवा व्यक्तिमत्त्व विकास सेवा केंद्रे

क) सार्वजनिक/सामुदायिक सेवा

**करून पहा व याबाबत विचार करा :** दिलेल्या तक्त्यात खालील बाबींचे वर्गीकरण करा.
ग्रंथालय, वाहतुकीच्या सुविधा, अग्निशामक दल, वीज व पाणीपुरवठा, शैक्षणिक संस्था, आरोग्य केंद्र, खेळाचे मैदान, छंद केंद्रे, टेलिफोन, दवाखाने, पोस्ट ऑफिस सेवा, सामाजिक क्लब, उद्याने, बँक, पोलिस, संगणक केंद्रे.

| आरोग्य आणि सुरक्षा सेवा | आत्मसंवर्धन किंवा व्यक्तिमत्त्व विकास सेवा/केंद्र | सांस्कृतिक/सामुदायिक सेवा |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

**१) दवाखाने/रुग्णालये :** आजारी व्यक्ती, अपघातातील व्यक्ती, गर्भवती स्त्रिया, तान्ही बाळं, मुले व वृद्ध अशा सर्वांना शासकीय आणि खाजगी दवाखान्यात वैद्यकीय उपचार मिळतात. ज्या रुग्णांची आर्थिक परिस्थिती चांगली नसते किंवा जे आर्थिक अडचणीत असतात किंवा दारिद्रेषेच्या खाली असतात, अशा रुग्णांना माफक दरात वैद्यकीय सेवा उपलब्ध होण्याकरिता शासकीय दवाखाने असतात. अशी रुग्णालये साधारणपणे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना जोडलेली असतात. अशा रुग्णालयात आपत्कालीन आणि तातडीच्या वैद्यकीय सेवा उपलब्ध असतात, याबरोबरच रोगमुक्त करणारी व रोगप्रतिबंधक औषधे मोफत किंवा कमी दरात उपलब्ध असतात.

या दवाखान्यांमध्ये शल्यचिकित्सा विभाग, क्ष-किरण चिकित्सा, दंत विभाग, सांसर्गिक रोग्यांसाठी स्वतंत्र विभाग (Isolation Ward), मलमूत्र चिकित्सा केंद्र इत्यादींपासून विशिष्ट आजारांकरिता विशिष्ट व अतिविशिष्ट (Speciality and Super Speciality) विभागांचा समावेश असतो. ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्रे स्थापान केलेली आहेत तसेच जिल्हा पातळीवर जिल्हा रूग्णालये आणि रक्तपेढीची उपलब्धता आहे.

या व्यतिरिक्त खाजगी रुग्णालये आणि शुश्रुषा सदने (Nursing Homes) विशेष शिक्षण घेतलेल्या तज्ज्ञांद्वारे चालविली जातात. विशेषता आणि अतिविशिष्टता (Speciality and Multispeciality) रुग्णालयात अपघात उपचार केंद्र, स्वतंत्र किंवा विभक्त विभाग (Isolation Ward), रक्तपेढी, क्ष-किरण विभाग, आंतर व बाह्य रुग्ण विभाग, शल्यचिकित्सागृह, अतिदक्षता विभाग (ICU) व अतिविशेष दक्षता विभाग (ICCU) असे वेगवेगळे विभाग असतात. रुग्णाला ताबडतोब दवाखान्यात भरती करण्यासाठी रुग्णवाहिकेची सोय असते. या व्यतिरिक्त विविध खाजगी संस्थांद्वारे अतिविशेष रुग्णालये चालविली जातात.

**२) पोलिस :** सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्याकरिता किंवा राखण्याकरिता तसेच जनतेच्या मालमत्तेचे व जीविताचे रक्षण करण्यासाठी पोलिस सेवा कार्यरत असते. महिलांची सुरक्षितता, हरविलेल्या व्यक्तींचा तपास, वाहन मार्गदर्शन व रहदारी नियंत्रण, गुन्ह्याच्या तक्रारींची नोंद घेऊन तपास करणे, तसेच निदर्शने, सभा, मोर्चे, धरणे, आंदोलने, मिरवणुका, संप आणि धार्मिक मिरवणूका योग्य पद्धतीने हाताळून नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी पोलिस दलावर सोपविलेली असते. पोलिस दलाच्या मदतीला श्वान पथक, न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, फिंगरप्रिंट ब्युरो, विस्फोटक ओळखणारे व निष्क्रिय करणारे पथक इत्यादी असते. प्रत्येक नागरिक या सेवांचा लाभ घेण्यास पात्र असतो.

**३) अग्निशामक दल :** संकटकाळी नागरिकांचे प्राण वाचविणे आणि सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे हा अग्निशामक दलाचा मुख्य उद्देश आहे. या सेवेचे दुसरे उद्दिष्ट म्हणजे कोठेही आग लागल्यास ती विझवणे व तेथील लोकांचे प्राण वाचविणे हे आहे. आग लागलेल्या स्थळी किंवा अपघाताच्या ठिकाणी बचाव कार्य व प्राथमिक उपचार करण्यासाठी अग्निशामक दलात आग विझविण्यासाठी लागणारे विशेष साहित्य व उपकरणांनी सुसज्ज गाड्या आणि तज्ज्ञ व प्रशिक्षित पथक असते. ही सेवा मोठ्या शहरात व महानगरपालिकेच्या क्षेत्रात उपलब्ध असते.

**४) करमणुकीची केंद्रे :** जनतेला दैनंदिन कामातील ताण दूर करून तनमन उत्साहित करण्यासाठी व कामाची प्रेरणा मिळण्यासाठी करमणूक किंवा मनोरंजन आवश्यक असते. शहरामध्ये करमणुकीच्या विविध सुविधा असलेली अनेक करमणूक केंद्रे असतात. यात चित्रपटगृहे, नाट्यगृहे, बैठे व मैदानी खेळ यांसाठी केंद्रे, ग्रंथालये आणि उद्याने इत्यादींचा समावेश होतो.

**५) छंद केंद्रे :** पेंटींग, संगीत, नृत्य, ओरिगामी, मूर्तीकाम इत्यादी विविध छंद जोपासण्यासाठी व विकसित करण्यासाठी विविध कला केंद्रे किंवा छंद केंद्रे असतात. लोक आपले छंद किंवा कौशल्य विकसित करण्यासाठी या केंद्राचा फायदा घेऊ शकतात.

**६) क्लब व सामुदायिक केंद्रे :** क्लब व सामुदायिक केंद्रांमुळे आत्मसंवर्धन किंवा व्यक्तिमत्त्व विकास होण्यास मदत होते. अशी केंद्रे फावल्या वेळात करायच्या विविध क्रिया किंवा काम उपलब्ध करून देतात. या केंद्राद्वारे विविध स्पर्धा, ज्ञानवर्धक कार्यक्रम, स्नेहसंमेलन इत्यादींचे आयोजन करून विविध धार्मिक, सामाजिक व राष्ट्रीय सण साजरे केले जातात.

**७) सार्वजनिक उद्याने व बगिचे :** मानवाच्या आनंदासाठी आणि मनोरंजनाकरिता सार्वजनिक उद्याने व बगिचे असणे अत्यंत आवश्यक आहे. व्यक्तीला फावला वेळ घालवण्यासाठी, वृद्ध आणि मुलांना खेळण्यासाठी आवश्यक

असतात. उद्याने व बगिचांचा उपयोग चालण्यासाठी, जॉगिंगसाठी व जिमसाठी होतो. अशा उद्यानांची व बगिचांची देखभाल व व्यवस्थापन महानगरपालिका करते.

८) **शैक्षणिक संस्था :** प्राथमिक शिक्षणातून व्यवसायाभिमूख शिक्षण व व्यावसायिक शिक्षण देण्याकरिता सरकारी, निमसरकारी आणि खाजगी संस्था विविध शैक्षणिक संस्था चालवितात. या संस्था शिक्षणासाठी आवश्यक सोयी–सुविधा उपलब्ध करून देतात आणि व्यक्तीच्या योग्यतेनुसार, आवडीनुसार व शैक्षणिक गुणवत्ता किंवा बुद्धिमत्तेनुसार विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाते. मूल्यशिक्षण आणि व्यक्तिमत्त्व विकास ही देखील शिक्षणाची महत्त्वाची अंग आहेत, ज्यामुळे जीवनाचा भक्कम पाया तयार होतो. शिक्षणामुळे व्यक्तीला आर्थिक स्थैर्य व सामाजिक प्रतिष्ठा लाभते. शिक्षणामुळे जबाबदार नागरिक निर्माण होतो.

९) **इतर सेवा :** टपाल सेवा, दूरभाष सेवा आणि वाहतूक सेवांचा या प्रकारात समावेश होतो.

अ) **टपाल सेवा/डाक :** केंद्र सरकार टपाल सेवा पुरविते, यालाच भारतीय टपाल किंवा डाक कार्यालय असेही म्हणतात. हा संचार आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या अंतर्गत येणारा विभाग आहे. टपाल किंवा डाक सेवेचे मूलभूत कार्य म्हणजे पत्रांचे संकलन, प्रक्रिया, प्रसारण आणि वितरण करणे हे आहे, यात पत्र व बिलांचा समावेश होतो. ही सेवा पार्सल्स, मनीऑर्डर त्याचबरोबर तिकिटे, पोस्टकार्ड्स आणि पाकिटे इत्यादी टपाल साहित्य विकणे अशा सेवा पुरविते.

टपाल कार्यालय बचत बँक, इलेक्ट्रॉनिक भारतीय पोस्टल ऑर्डर, भारतीय पोस्ट पेमेंट बँक, पोस्टल जीवन विमा अशा सेवा पुरविते. टपाल विभागाच्या अल्पबचत विभागामार्फत बचतीच्या विविध योजना, जसे बचत खाते, आवर्ती ठेव खाते, मुदतबंद ठेव, राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे आणि किसान विकास पत्र इत्यादी योजना राबविल्या जातात. लोकांमध्ये बचतीची सवय विकसित करण्यास याची मदत होते.

ब) **वाहतुकीच्या सेवा :** नागरिकांकरिता वाहतुकीच्या विविध सेवा जसे – राज्य परिवहन मंडळाची बस सेवा, रेल्वे सेवा, विमान सेवा, जलवाहतूक सेवा, केंद्र व राज्य सरकारद्वारे तसेच स्थानिक प्रशासन व खाजगी कंपन्यांद्वारे चालविल्या जातात.

क) **दूरभाष सेवा :** दूरभाष सेवेत फोन (landline telephone) आणि भ्रमणध्वनी सेवेचा समावेश होतो. ही सेवा स्थानिक व जागतिक पातळीवर संवाद साधण्यासाठी स्थानिक कॉल्स, एस.टी.डी., आय.एस.डी. सेवा देते. दूरभाष विभाग ग्राहकांसाठी इंटरनेट सेवा देखील उपलब्ध करून देते. हा विभाग केंद्र सरकारद्वारा चालविला जातो. आजकाल खाजगी सेवा देणाऱ्या संस्थाही फोन, भ्रमणध्वनी सेवा व इंटरनेट सेवा देतात.

**सांगा पाहू :**

यापूर्वी तुम्ही कोणकोणत्या सामुदायिक सेवांना भेटी दिल्या आहेत/वापरल्या आहेत?

**जरा डोके चालवा.**

मानवीय आणि अमानवीय संसाधनातील फरक सांगा

| मानवीय संसाधने | अमानवीय संसाधने |
|---|---|
| ही अमूर्त स्वरूपाची असतात. | ही मूर्त स्वरूपाची असतात. |
| | |
| | |
| | |

## ५.३ संसाधनांची वैशिष्ट्ये :

संसाधनांचा आणि गृहव्यवस्थापनाचा घनिष्ट संबंध आहे. संसाधनाच्या व्यवस्थापनामुळे संसाधनांचा योग्य वापर करता येऊ शकतो. त्याचप्रमाणे संसाधनाच्या योग्य वापरामुळे त्याचे व्यवस्थापन चांगले करता येते. संसाधनांच्या व्यवस्थापनाकरिता प्रत्येक व्यक्तीला संसाधनांची वैशिष्ट्ये माहिती असणे आवश्यक आहे.

संसाधनांची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत –

अ) संसाधने उपयुक्त असतात.

ब) संसाधने मर्यादित असतात.

क) संसाधने परस्पर संबंधित असतात.

ड) सर्व संसाधनांना व्यवस्थापन प्रक्रिया लागू करता येते

**नेहमी लक्षात ठेवा :**
संसाधनांची वैशिष्ट्ये काय काय आहेत?

**अ) संसाधने उपयुक्त असतात :** उपयुक्तता हे सर्व संसाधनांचे मूलभूत वैशिष्ट्य आहे. संसाधने म्हणजे अशी गोष्ट, की ज्याद्वारे आपल्याला कार्य करता येते किंवा ध्येय साध्य करता येते. संसाधनांची ही परिभाषाच उपयुक्तता हे वैशिष्ट्य स्पष्ट करते. विशिष्ट ध्येय किंवा विशिष्ट परिस्थितीच्या अनुषंगाने संसाधनांची उपयुक्तता ओळखता येऊ शकते. विशिष्ट परिस्थितीत एखादे संसाधन महत्त्वाचे किंवा प्रमुख संसाधन म्हणून वापरले जाते, तर इतर संसाधने सहाय्यभूत संसाधने म्हणून भूमिका निभावतात. उदाहरणार्थ, उपकरणाच्या खरेदीस पैसा हे संसाधन प्रमुख असते, तर परीक्षेत ज्ञान आणि हुशारी प्रमुख संसाधन म्हणून काम करते. एखाद्या गोष्टीची उपयुक्तता ओळखल्याशिवाय त्याला संसाधन म्हणता येत नाही.

**ब) संसाधने मर्यादित असतात :** सर्व मानवीय व अमानवीय संसाधने मर्यादित असतात. काही संसाधनांची उपलब्धतता इतर संसाधनांपेक्षा कमी असते म्हणूनच त्याचा काळजीपूर्वक उपयोग करणे गरजेचे असते. याकरिताच व्यवस्थापन प्रक्रियेचे ज्ञान आणि उपयोगिता माहिती असणे गरजेचे असते. विशिष्ट ध्येयाच्या अनुषंगाने संसाधनांची मर्यादा ओळखावी. संसाधनांची मर्यादा व्यक्तीपरत्वे बदलते. संसाधनांच्या मर्यादा दोन प्रकारच्या असतात –

अ) परिमाणात्मक मर्यादा

ब) गुणात्मक मर्यादा

**अ) परिमाणात्मक मर्यादा :** सर्व अमानवीय संसाधनांना परिमाणात्मक मर्यादा असतात. परिमाणात्मक मर्यादा सहज मोजता येण्यासारख्या असतात. उदाहरणार्थ, व्यक्ती किंवा कुटुंबाजवळ उपलब्ध असलेला पैसा वेळेसारख्या मानवीय संसासधनाला परिमाणात्मक मर्यादा आहेत. जसे – प्रत्येक व्यक्तीला तिचे दैनंदिन व्यवहार पार पाडण्यासाठी २४ तासच उपलब्ध असतात.

**ब) गुणात्मक मर्यादा :** सर्व संसाधनांना गुणात्मक मर्यादा असतात. अशा मर्यादा मोजणे कठीण असते. अशा मर्यादा प्रत्येकाने ओळखाव्यात व जाणून घ्याव्यात. उपयोगिता, आरामदायकता, टिकाऊपणा इत्यादी वैशिष्ट्यांच्या बाबतीत गुणात्मक मर्यादा वेगवेगळी असते.

निर्णय घेताना प्रत्येकाने संसाधनांच्या गुणात्मक मर्यादा लक्षात घेणे आवश्यक असते. कुटुंबातील सदस्यांजवळ असणाऱ्या योग्यता आणि प्रवृत्तींना देखील काही मर्यादा असतात. या मर्यादा व्यक्तीच्या जन्मजात योग्यता व प्रशिक्षणावर अवलंबून असतात. काही लोकांजवळ असलेली जन्मजात योग्यता प्रशिक्षणाने वाढविता येऊ शकते, परंतु काही लोकांजवळ अशी योग्यता नसल्यास कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण अशी योग्यता वाढवू शकत नाही.

**क) संसाधने परस्पर संबंधित असतात :** ध्येयाची पूर्तता करण्याकरिता सर्वसामान्यपणे आपल्याला एकापेक्षा अधिक संसाधने किंवा अनेक संसाधनांची एकत्रितरित्या गरज असते. उदाहरणार्थ, एखाद्या व्यक्तीला संगणक वर्गाला जायचे असेल तर त्याला किंवा तिला संसाधनांची एकत्रित गरज असते जसे, फी करिता पैसे, जास्तीचा वेळ व ऊर्जा आणि संगणक. असे दिसून येते की, एका संसाधनाची बचत केल्यास दुसरे संसाधन जास्त वापरले जाते किंवा उपयोगात येते. एका संसाधनाचा उपयोग दुसऱ्या संसाधनाच्या उपयोगावर परिणाम करू शकतो. एखाद्या संसाधनाची कमतरता किंवा अतिशय अल्प प्रमाणात असलेली उपलब्धता ठरविलेल्या ध्येयाच्या प्राप्तीवर परिणाम करू शकते. उदाहरणार्थ, रेडिमेड ड्रेस विकत घेण्यापेक्षा ड्रेस घरी शिवल्यास पैशाची बचत होईल, परंतु वेळ व ऊर्जा जास्त वापरली जाईल. कुटुंबातील सदस्यांजवळ असलेल्या जन्मजात कौशल्य व योग्यतेचा उपयोग करून स्वत:चा व्यवसाय

सुरू केल्यास पैसा जास्त मिळेल, ज्यामुळे ध्येय साध्य करण्यासाठी उपकरणे व सेवा उपलब्ध होऊ शकतात.

**ड) सर्व संसाधनांना व्यवस्थापन प्रक्रिया लागू करता येते :** बऱ्याच वेळा व्यक्ती किंवा कुटुंबाजवळ असलेली संसाधने मर्यादित असतात व साध्य करावयाची ध्येय असंख्य असतात. अशा वेळी व्यवस्थापन प्रक्रिया उपयुक्त ठरते. संसाधनांची गरज आणि उपलब्धतेतील दरी भरून काढण्यासाठी व्यवस्थापन प्रक्रिया साहाय्य करते. काळजीपूर्वक विचाराने, योग्य निर्णय घेऊन उत्तम नियोजन आणि वेळेच्या नियंत्रणामुळे संसाधनांची उपयोगिता वाढविता येऊ शकते. उदाहरणार्थ, कौटुंबिक अंदाजपत्रक केल्यामुळे अनावश्यक खर्च कमी करून खरेदीचा व बचतीचा प्राधान्यक्रम ठरविण्यास मदत होते. अशा अंदाजपत्रकाचे मूल्यांकन कौटुंबिक उत्पन्न, बचत व गुंतवणूक वाढविण्याचे मार्ग सुचविते. त्याचप्रमाणे व्यवस्थापन प्रक्रियेच्या उपयोगाने सर्व संसाधनांची उपयोगिता वाढविता येऊ शकते. संसाधनांच्या वरील मूलभूत वैशिष्ट्यांव्यतिरिक्त अजून काही वैशिष्ट्ये आहेत.

**चर्चा करा :**

संसाधनांची खालील वैशिष्ट्ये उदाहरणांसह स्पष्ट करा :

अ) संसाधने विकसित करता येऊ शकतात.

ब) संसाधनांचा पर्यायी उपयोग करता येऊ शकतो.

क) संसाधने जीवनाची गुणवत्ता वाढवितात.

ड) संसाधनांचा पर्यायी उपयोग असतो.

**जरा डोके चालवा :**

मानवीय आणि अमानवीय संसाधनांमधील समानतेची यादी करा.

**५.४) कौटुंबिक संसाधानांच्या उपयोगावर परिणाम करणारे घटक :** खालील घटक संसाधनांच्या उपयोगावर परिणाम करतात.

अ) ज्ञान, कौशल्य व प्रवृत्ती

ब) शिक्षण

क) राहणीमानाचा स्तर

ड) मौद्रिक उत्पन्न

इ) वास्तव्याचे ठिकाण

फ) कौटुंबिक जीवनचक्राच्या अवस्था

ग) गृहिणींचे आर्थिक सहाय्य

**अ) ज्ञान, कौशल्य व प्रवृत्ती :** ज्ञान, कौशल्य व प्रवृत्ती यासारख्या मानवीय संसाधनांचा वापर इतर मानवीय व अमानवीय संसाधनांच्या उपयोगांवर परिणाम करू शकतो. फूडप्रोसेसर, ओव्हन, मायक्रोवेव्ह ओव्हन यांसारखी आधुनिक उपकरणे वापरण्याचे ज्ञान असल्यास, विविध पदार्थ करण्याचे कौशल्य असल्यास आणि कुटुंबाकरिता स्वयंपाक करण्याची प्रवृत्ती असल्यास कुटुंबाचा वेळ, ऊर्जा आणि पैशाची बचत होण्यास मदत होऊन त्याच्या उपयोगाने इतर ध्येय साध्य करता येतात.

**ब) शिक्षण :** शिक्षणातून मिळणाऱ्या माहितीमुळे ज्ञानाची पातळी वाढण्यास मदत होते, निर्णय घेण्याची क्षमता आणि व्यवस्थापकीय कौशल्य विकसित होतात. कुटुंबातील सदस्यांची विचार करण्याची क्षमताही शिक्षणामुळे वाढण्यास मदत होते.

**क) राहणीमानाचा स्तर किंवा दर्जा :** राहणीमानाचा स्तर म्हणजे व्यक्तीला उपलब्ध असलेला पैसा, सुखसोयी आणि समाधानाची पातळी होय, व्यक्ती जे जगण्यासाठी आवश्यक आहे असे समजत असते. राहणीमानाच्या स्तराचा संसाधनांच्या उपयोगावर परिणाम होतो. उदाहरणार्थ, राहणीमानाचा उच्च स्तर असलेले कुटुंब हे वेळ आणि ऊर्जेच्या बचतीसाठी श्रमबचतीच्या जास्त साधनांचा आणि स्वत:च्या वाहनाचा उपयोग करेल तर इतर कुटुंबे अशा साधनांच्या खरेदीकरिता पैशाची बचत करण्यासाठी जास्त वेळ आणि ऊर्जेचा उपयोग करतील.

**ड) मौद्रिक उत्पन्न :** पैसा किंवा मौद्रिक उत्पन्न हे कोणत्याही कुटुंबाचे भौतिक संसाधन असते. आवश्यक तेव्हा पैसा खर्च करून आपण घरात जास्त चांगल्या सोयी-सुविधा उपभोगू शकतो. जास्त पैसा असलेली कुटुंब चैनीच्या वस्तू, मनोरंजन आणि सुखसोयींकरिता सहज पैसा खर्च करेल, तर मध्यमवर्गीय कुटुंब आवश्यक ध्येयांच्या पूर्ततेकरिता पैशाचा काळजीपूर्वक उपयोग करेल.

**इ) वास्तव्याचे ठिकाण :** कुटुंबाचे वास्तव्याचे म्हणजे राहण्याचे ठिकाण हे वेळ, ऊर्जा किंवा शक्ती, पैसा

व वाहतुकीच्या सोयी यांसारख्या संसाधनांवर निश्चित परिणाम करते. कामाचे ठिकाण, शाळा, कॉलेज, बाजारपेठ इत्यादींपासून राहण्याचे ठिकाण दूर असल्यास दैनंदिन कामे करण्यासाठी कुटुंबाला वेळ, ऊर्जा, पैसा व इतर संसाधने जास्त प्रमाणात लागतात.

**फ) कौटुंबिक जीवनचक्राची अवस्था :** कुटुंबाच्या जीवनचक्राच्या अवस्था आणि कुटुंबाच्या आकारानुसार कौटुंबिक संसाधनांचा उपयोग खूप बदलतो. दोन व्यक्तींनी कुटुंबाची सुरुवात होते, अपत्यांच्या जन्मामुळे ते विस्तारते आणि मुले मोठी झाल्यामुळे शिक्षण किंवा नोकरीच्या निमित्ताने घराबाहेर पडल्यामुळे आकुंचित होते. या प्रत्येक अवस्थेत कुटुंबाचा आकार, निश्चित करण्याची आणि साध्य करावयाची ध्येये आणि संसाधनांची उपलब्धता बदलते व याचा संसाधनांच्या उपयोगावर परिणाम होतो. उदाहरणार्थ, कुटुंबाच्या प्रारंभिक अवस्थेत वेळ व ऊर्जेची मागणी कमी असते, तर विस्तारित अवस्थेत अपत्यांची काळजी घेण्यासाठी आणि त्यांना वाढविण्यासाठी गृहिणींना जास्त वेळ, ऊर्जा, पैसा आणि भौतिक वस्तूंचा वापर करावा लागतो. आकुंचित अवस्थेत कुटुंबात वृद्ध व्यक्ती असतात. त्यामुळे औषधांकरिता आणि पगारी मदतनिसाकरिता जास्त पैशांची गरज असते.

**ग) गृहिणींचे आर्थिक सहाय्य :** गृहिणी अर्थार्जन करीत असल्यास कुटुंबाचे उत्पन्न वाढते, त्यामुळे निश्चितच मानवीय संसाधने वाढतात. परंतु अशा वेळी गृहिणीची मानवीय संसाधने जसे - वेळ, ऊर्जा आणि कौशल्य जास्त उपयोगात येऊन गृहिणीला शारीरिक व मानसिक थकवा येऊ शकतो.

**चर्चा करा :**

वरील घटक तुमच्या दैनंदिन आयुष्यावर कसे परिणाम करतात?

**जोड माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाची :**

संगणकाचा संसाधन म्हणून उपयोग विस्तृतपणे सांगा.

## थोडे आठवा :

- कौटुंबिक ध्येय साध्य करण्यासाठी व विविध कार्य करण्याकरिता कुटुंबाजवळ उपलब्ध असलेल्या मूर्त आणि अमूर्त घटकांना कौटुंबिक संसाधने असे म्हणतात.
- वेगवेगळ्या मागण्यांच्या पूर्ततेकरिता आवश्यकती सुप्तशक्ती असणारे महत्त्वपूर्ण घटक म्हणजे संसाधने.
- संसाधनांचे वर्गीकरण मानवीय संसाधने जसे - वेळ, ऊर्जा, कौशल्य, योग्यता, आवड, प्रवृत्ती इत्यादी आणि अमानवीय संसाधने जसे - पैसा, भौतिक वस्तू, मालमत्ता, सामुदायिक सुविधा असे करतात.
- सामुदायिक सुविधांमध्ये खालील सुविधांचा समावेश होतो.
  - अ) आरोग्य आणि सुरक्षा सेवा, जसे- दवाखाने, अग्निशामक दल, पोलिस इत्यादी.
  - ब) आत्मसंवर्धन आणि व्यक्तिमत्त्व विकास सेवा, जसे- शाळा, कॉलेज, ग्रंथालये, उद्याने, खेळाचे मैदान, छंद केंद्र, संगणक केंद्र, सामाजिक क्लब इत्यादी.
  - क) सार्वजनिक आणि सामुदायिक सेवा, जसे - टपाल सेवा, बँक, वाहतूक, टेलिफोन, वीज, पाणीपुरवठा इत्यादी.
- संसाधनांची मूलभूत वैशिष्ट्ये -
  - अ) संसाधने उपयुक्त असतात.
  - ब) संसाधने एकमेकांशी संबंधित असतात.
  - क) संसाधनांना मर्यादा असतात.
  - ड) सर्व संसाधनांना व्यवस्थापन प्रक्रिया लागू करता येते.
  
  ज्ञान, कौशल्य व प्रवृत्ती, शिक्षण, राहणीमानाचा दर्जा, वास्तव्याचे ठिकाण, कौटुंबिक जीवनचक्राच्या अवस्था आणि गृहिणींचे आर्थिक सहाय्य हे कौटुंबिक संसाधनांवर परिणाम करणारे घटक आहेत.

## स्वाध्याय

- **वस्तुनिष्ठ प्रश्न :**

**१) बहुपर्यायी प्रश्न.**

१. रक्षित करण्यात आलेल्या आधाराच्या व मदतीच्या ____________ ला संसाधन असे म्हणतात.

अ) ध्येय

ब) गरजा

क) स्रोत

२. ऊर्जा म्हणजे काम करण्याची ____________ होय.

अ) योग्यता

ब) कौशल्य

क) आवड

३. विविध संकटकाळी आणि अपघाताच्या वेळी नागरिकांचे प्राण वाचविणे आणि सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे ____________ चा मुख्य उद्देश आहे.

अ) पोलिस

ब) अग्निशामक दल

क) दवाखाने

४. ज्ञान हे ____________ संसाधन आहे.

अ) मानवीय

ब) अमानवीय

क) सामुदायिक

५. सर्व अमानवीय संसाधनांना ______ मर्यादा असतात.

अ) गुणात्मक

ब) परिमाणात्मक

क) गुणात्मक आणि परिमाणात्मक

**२) जोड्या जुळवा.**

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| १) सामुदायिक सेवा | अ) घर |
| २) ऊर्जा | ब) वेतन, निवृत्तीवेतन |
| ३) मालमत्ता | क) शारीरिक व मानसिक योग्यता |
| ४) योग्यता | ड) शाळा आणि महाविद्यालये |
| ५) पैसा | इ) शारीरिक व मानसिक काम |

**३) खालील वाक्ये चूक किंवा बरोबर ते ओळखा.**

१) राहणीमानाचा दर्जा कौटुंबिक संसाधनांच्या उपयोगांवर परिणाम करतो.

२) अमानवीय संसाधने आंतरिकरित्या निर्माण होतात.

३) वेळ हे मानवीय संसाधन आहे.

४) पैसा सर्वांनाच सारखा उपलब्ध असतो.

५) महाविद्यालये आणि दवाखाने ही मानवीय संसाधने आहेत.

- **लघुत्तरी प्रश्न :**

**१) थोडक्यात उत्तरे लिहा.**

खालील उत्तरे लिहा.

अ) संसाधनांचा अर्थ स्पष्ट करा.

ब) मानवीय संसाधनांची नावे लिहा.

क) अमानवीय संसाधनांची नावे लिहा.

**२) व्याख्या लिहा.**

अ) संसाधने

ब) मानवीय व अमानवीय संसाधने

क) वेळ

ड) ऊर्जा

इ) योग्यता

फ) प्रवृत्ती

**३) फरक लिहा.**

अ) मानवीय आणि अमानवीय संसाधने

ब) वेळ आणि पैसा

क) योग्यता आणि कौशल्य

**४) टिपा लिहा.**

अ) वेळ आणि ऊर्जा

ब) आवड आणि योग्यता

क) कौशल्य आणि ज्ञान

ड) पैसा आणि भौतिक वस्तू

इ) भौतिक वस्तू व मालमत्ता

फ) दवाखाने

ग) पोलिस व अग्निशामक दल

ह) मनोरंजन आणि छंद केंद्र

ई) क्लब, उद्याने व बगिचे

ज) शैक्षणिक संस्था

ह) टपाल सेवा

ल) वाहतुकीच्या सुविधा व टेलिफोन सेवा

• **दीर्घोत्तरी प्रश्न :**

अ) मानवीय संसाधने स्पष्ट करा.

ब) संसाधनांचे वर्गीकरण करून अमानवीय संसाधनांवर लिहा.

क) संसाधनांची वैशिष्ट्ये सविस्तर लिहा.

ड) कौटुंबिक संसाधनांच्या उपयोगावर परिणाम करणारे घटक उदाहरणांसह स्पष्ट करा.

**प्रोजेक्ट :**

१) तुमच्या कुटुंबाजवळ असलेली मानवीय व अमानवीय संसाधनांची यादी करा.

२) तुमच्या शहरात/गावात उपलब्ध असलेल्या सामुदायिक सुविधांचे निरीक्षण करा आणि त्याची जनतेला असलेल्या उपयुक्ततेचे विश्लेषण करा.

❑❑❑